

# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २०५ वा ❑ बुधवार दि.०१ ऑक्टोबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## धर्माच्या नावाखाली बाबांची अश्लीलता चिंताजनक

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

संत आणि ऋषींचा महिमा अफाट आहे कारण ते दैवी ज्ञान, भक्ती आणि प्रेमाचा संदेश देतात, ज्यामुळे लोकांना आंतरिक परिवर्तन आणि सद्गुणांकडे प्रगती करण्यास मदत होते. संतांचे आध्यात्मिक अनुभव, निःस्वार्थ सेवा आणि मानवतेवरील प्रेम लोकांना योग्य मार्गावर मार्गदर्शन करतात आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणतात. त्यांच्या सहवासात, भौतिकवादाच्या पलीकडे जाऊन पवित्रता आणि अध्यात्म प्राप्त करता येते.‘‘साधू‘‘ या शब्दाचा उल्लेखच हृदयाला भिडतो. एका साधूचे वर्णन करताना तुलसीदास म्हणाले होते, ‘‘साधू सराही सुमन सुर वर्षा.‘‘ जेव्हा एखादा साधू बोलतो तेव्हा अमृत आणि फुले पडतात. साधूंना आध्यात्मिक, निस्वार्थी सेवक आणि सद्गुणी मानले जाते. शंकराचार्य, स्वामी परमहंस आणि प्राचीन काळातील ब्रह्मर्षींनी समाजाचे मार्गदर्शन केले आहे. आज भागवताचार्य राजेंद्र, नित्यानंद, पायलट बाबा आणि इच्छाधारी बाबा यांसारखे साधू या गौरवशाली इतिहासाला कलंकित करत आहेत. धर्माच्या नावाखाली व्यवसाय सुरू करणारे हे साधू वेश्याव्यवसायाच्या पातळीवरही पोहोचले आहेत.

धर्म आणि राजकारणाचे मिश्रण प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे, परंतु लैंगिकतेच्या नावाने आध्यात्मिकतेला भ्रष्ट केले आहे. अशा परिस्थितीत आपण कोणावर विश्वास ठेवावा? आध्यात्मिक व्यक्तींवरील विश्वास का कमी होत चालला आहे? देशातील काही बाबा धर्माच्या अश्लिल कार्य करत आहे. अलीकडे धर्माच्या आड काळे व तितकेच अश्लिल कृत्य करणाऱ्या बाबा चैतन्यानंद यांना न्यायालयाने पाच दिवसाची कोठडी सुनावली.

१७ विद्यार्थिनींचं लैंगिक शोषण करणाऱ्या स्वयंघोषित अध्यात्मिक स्वामी चैतन्यानंद सरस्वतीला अखेर पोलिसांनी अटक केली. दिल्लीमधील एका कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनींचे या बाबाने लैंगिक शोषण केले. दिल्ली पोलिसांनी आग्रा येथून स्वामी चैतन्यानंद सरस्वती उर्फ पार्थ सारथीला अटक केली.

दक्षिण दिल्लीतील शारदा इन्स्टिट्यूट ऑफ इंडियन मॅनेजमेंटशी संबंधित हे प्रकरण आहे. याठिकाणी शिकणाऱ्या १७ विद्यार्थिनींनी स्वामी चैतन्यानंद सरस्वतीवर गंभीर आरोप केले होते. विद्यार्थ्यांचा आरोप आहे की, स्वामी चैतन्यानंद सरस्वतीने ग्रेड कमी करण्याची धमकी देऊन त्यांना ब्लॅकमेल के. तो रात्री उशिरा मुलींना त्याच्या खोलीत बोलावत असे आणि स्वतःला इंटरनॅशनल व्यक्ती असल्याचे सांगत चांगल्या प्लेसमेंटचे आमिष दाखवत असे. विद्यार्थिनींना धमकी देखील दिली जात होती. या घृणास्पद कृत्याचा पर्दाफाश झाल्याने संस्थेत खळबळ उडाली.

विद्यार्थ्यांनी सांगितले की, सुरक्षेच्या नावाखाली महिला वसतिगृहात आणि खोल्यांमध्ये अगदी बाथरूमजवळही सीसीटीव्ही कॅमेरे बसवले होते. स्वामी चैतन्यानंद सरस्वती स्वतः त्यांच्या मोबाईल फोनवरून त्यांच्या फीडचे निरीक्षण करत होते. त्यांच्याकडे सीसीटीव्ही फुटेज होते आणि ते नेहमीच मुलींवर लक्ष ठेवत होते. रात्री स्वामी चैतन्यानंद सरस्वती मुलींना व्हॉट्सअ‍ॅप बेबी, आय लव्ह यू असे मेसेज पाठवत असे.

दुष्कृत्य करणाऱ्यांना साधू,संत म्हणायचे का?

खऱ्या संताचा स्वभाव शांत, सहनशील, दयाळू आणि निःपक्षपाती असावा, तो वासना, क्रोध, लोभ आणि आसक्ती यांसारख्या दुर्गुणांपासून मुक्त असावा. तो हितचिंतक, शुद्ध आणि निःस्वार्थ हृदयाचा असावा आणि इतरांना दुःख देण्याऐवजी दुःख सहन करण्यास तयार असावा. तो अलिप्तता, तपस्या आणि आध्यात्मिक ज्ञानात दृढ असावा आणि इतरांना योग्य मार्गावर मार्गदर्शन करावे,अशी अपेक्षा साधू संतांकडून असते.मात्र आज भोंदू गिरी करणाऱ्या, अश्लिल चाळे करणाऱ्या साधू संतांची संख्या वाढत आहे,जी चिंताजनक आहे.अशा विकृत बाबांपासून सावध राहण्याची गरज आहे.

# श्रीयशमध्ये स्मार्ट इंडिया हॅकेथॉनचे आयोजन

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगर येथील श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात नुकतेच आंतरिक स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२५ यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या हॅकेथॉनमध्ये एकूण ४५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता, यामध्ये १७६ मुली विद्यार्थिनींचा उत्साही सहभागही राहिला. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण विचार, तंत्रज्ञानावर आधारित समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क आणि सर्जनशीलता यांचा विकास करणे हा होता.



कार्यक्रमाची सुरुवात औपचारिक उद्घाटन समारंभाने झाली. यावेळी प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील आणि डीन अकॅडमिक्स डॉ. पी. एम. अर्धपुरकर प्रमुख उपस्थित होते. समन्वयक डॉ. सोहेल राणा यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धेबाबत आवश्यक मार्गदर्शन व सूचना दिल्या. डीन अकॅडमिक्स डॉ. अर्धपुरकर यांनी विद्यार्थ्यांना आपली क्षमता सिद्ध करण्यासाठी प्रेरणा दिली. प्राचार्य डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण प्रकल्प तयार करून जीवन अधिक सुलभ, सोपे व समाजोपयोगी करण्यास प्रोत्साहित केले.

उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या टीमद्वारे सादरीकरणे सुरू केली. विद्यार्थ्यांचे प्रकल्प दैनंदिन जीवनातील समस्या तसेच उद्योग क्षेत्रातील अडचणी सोडविण्यास उपयुक्त, जीवन अधिक सोपे व सुलभ करणारे आणि समाजोपयोगी ठरणारे होते. प्रत्येक टीमने आत्मविश्वासाने आणि सर्जनशीलतेने आपली कल्पना मांडली. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याबरोबरच विचार करण्याची क्षमता, नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि कार्यक्षम टीमवर्क दिसून आले.

या प्रकल्पांचे मूल्यांकन अंतर्गत तज्ज्ञ परीक्षक मंडळींनी केले. परीक्षक समितीत पुढील शाखांतील प्रमुखांचा समावेश होता: डॉ. सोहेल राणा (व्हीएलएसआय अभियांत्रिकी), डॉ. सी. श्रीनिवास मूर्ती (इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी), प्रा. जी. एस. वायाळ (संगणक अभियांत्रिकी), डॉ. हुलास तोंडे (यांत्रिकी अभियांत्रिकी), डॉ. डी. व्ही. रमणा (विद्युत अभियांत्रिकी), प्रा. आर. डी. वाघ (डेटा सायन्स), प्रा. एस. एस. मंडवाले (कृत्रिम बुद्धिमत्ता व यंत्र शिक्षण अभियांत्रिकी).

परीक्षकांनी प्रकल्पांचे मूल्यांकन नाविन्य, उपयुक्तता, सामाजिक प्रभाव आणि सादरीकरण कौशल्य या निकषांवर केले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना आपले प्रकल्प अधिक प्रभावी व कार्यक्षम करण्यासाठी मार्गदर्शन दिले गेले. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरूळे ह्यांनी सर्व विद्यार्थी आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

# नकार देवीमातेचा

ज्योतिर्मय साहित्य

आज गोष्ट लाघवी वैष्णवीची. इयत्ता दुसरीच्या वर्गात असताना तिची घट्ट मैत्री झाली सईशी. ती जे करेल, जे बोलेल ते वैष्णवीला खूप आवडायचं. माझी मैत्रीण सई अशी, तिचा फ्रॉक किती छान, तिची चप्पल किती सुंदर, सई अशी सई तशी. अशा एक ना अनेक तिच्या सगळ्याच गोष्टी वैष्णवीला नवलाईच्या आणि कौतुकाच्या वाटायच्या.

‘‘आई, आज सईनं डब्यात भेंडीची भाजी आणलेली ती किती चवदार होती. तू का करत नाही तशी भाजी?‘‘ या अशा प्रश्नांवर मी नेहमी खट्टू व्हायचे. पण क्षणभरच. तिच्या लक्षात यायचं की काय कोण जाणे! मग आधीच मोठे असलेले डोळे आणखी मोठे करून आपल्या चिमुकल्या हातांची माळ माझ्या गळ्यात घालून अश्शी काय लाडीगोडी लावायची की बस् !

त्यावर्षीच्या गोकुळाष्टमीला वैष्णवी कृष्णाची तर सई राधेची वेशभूषा करून शाळेत गेलेल्या. खूप गोड दिसत होत्या या गोडांब्या. आजही या राधाकृष्णाचे फोटो काढून बघत बसावं आणि ते दिवस पुन्हा एकदा अनुभवावेत हा माझा जीवापाड जपलेला छंद.

सई कधी माझ्याशी भांडत नाही, कध्धीच कट्टी फू पण करत नाही आणि एक गोळीही माझ्याशिवाय खात नाही , असा सगळा गोडीगुलाबीचा मामला होता.



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

आमच्या लहानपणी आम्ही चिमणीच्या दाताने गोळी वाटून घ्यायचो. तीच गोडी ही जोडगोळी चाखत होती हे पाहून मला मनापासून आनंद व्हायचा. याच जोडगोळीची ही मजेशीर गोष्ट.

एके दिवशी वैष्णवी शाळेतून घरी आली तीच मुळी आधीच गोब-या असलेल्या गालात राग-रुसव्याची लालेलाल सफरचंदं कोंबून.

ना आई अशी गोड हाक मारली ना गळ्यात हातांची माळ घातली. रोजच्या पेक्षा वेगळाच मूड दिसत होता.

दप्तर अक्षरशः फेकून दिलं आणि एका कोपऱ्यात जाऊन दोन गुडघ्यांच्या मध्ये तोंड खुपसून ती हुंदके देऊ लागली.

आधी वाटलं काही मागणी असेल ती मान्य करून घेण्यासाठी लटके लटके रडत असेल. पण नाही. नूर काही वेगळाच होता तिचा. मग तिला थेट विचारलंच.‘‘ काय झालंय गं आज शाळेत? का रडतेयस?‘‘

जणू ती या प्रश्नाची वाटच बघत होती. झटक्याने मान वर करून डबडबलेल्या डोळ्यांनीच आधी बोलली. तिला आणखी जवळ घेतलं तशा गंगा जमुना गालांवरून ओघळून माझ्या खांद्यावर आल्यापण.

काही क्षणातच रडू ओसरलं. ‘‘आई, माझा मामा कुठाय? ‘‘ मी म्हटलं ‘‘तो आहे त्याच्या गावी.‘‘

तशी दोन्ही तळहातांचं पूर्ण उमललेलं कमळाचं फूल करत विचारते कशी?

‘‘ मामाच्या त्या गावात एवढाला कार्टूनचा चेहरा असलेली पेन्सिल मिळते तरी का? मला नको असला मामा आणि त्याचं असलं गाव‘‘

गाडी कुठल्या रुळावरून घसरलीय ते माझ्या लक्षात आलं. हुंदके ओसरल्यावर तिनं सगळं सांगितलं मला. आज किनै सईनं कितीतरी रंग असलेली मोठ्ठी पेन्सिल आणली होती आणि ना त्या पेन्सिलला कार्टूनचा चेहरा होता. ती पेन्सिल ना तिच्या मामानं तिला दिली होती.‘‘

मी म्हटलं, मग आत्ताच आपण आपल्या मामाला पत्र लिहू आणि सांगू की तूही येताना सेम तसलीच पेन्सिल घेऊन ये. त्यात काय एवढं?‘‘

तिच्या फुरफुरणा-या नाकपुड्या बघून मला कळलंच की खरी मेख याच प्रश्नांच्या उत्तरात आहे ते.

‘‘आई, तिचा मामा एका मोठ्या ढगाच्या पलीकडे असलेल्या देशात राहतो तिथून आणलीय त्यानं ती पेन्सिल तेही विमानातून. आपला मामा इथंच तर राहतो तो कसा आणेल बरं?‘‘

म्हटलं, मग तुझ्या मैत्रिणीलाच माग की थोड्या वेळासाठी ती पेन्सिल.

आता पुन्हा नाक ओलावलं, ‘‘मागितली होती पण ती म्हणाली, मी माझ्या देवी मातेला विचारते की देऊ का वैष्णवीला पेन्सिल, ती जर हो म्हणाली तरच देणार.‘‘ आता माझी उत्सुकता चाळवली. मग? मी विचारलं.

तिनं सांगितलं, सईनं डोळे मिटून हात जोडले आणि काहीतरी कुणाशी तरी बोलली आणि थोड्यावेळाने डोळे उघडून म्हणाली, माझी देवीमाता म्हणतेय नको देऊ पेन्सिल वैष्णवीला. मग मी नाही देणार तुला पेन्सिल.‘‘ असं म्हणताच वैष्णवीचा बांध फुटला आणि ती हमसून हमसून रडू लागली.

आता माझ्यापुढे मोठा प्रश्न होता की हिची समजूत कशी घालावी? बिचारी रडून रडून तशीच झोपली आणि माझं विचारचक्र सुरू झालं

बालमैत्री ही आपल्या आयुष्यातील सर्वात नाजूक, पण सगळ्यात निरागस नात्यांपैकी एक. वैष्णवीसईची गोष्ट नेमकी हेच सांगते. लहान मुलांचं जग अगदी सोपं दिसतं, पण त्यातल्या छोट्या-छोट्या घटना त्यांच्या भावविश्वावर खोल ठसा उमटवतात.

सईकडे मिळालेली कार्टून पेन्सिल वैष्णवीसाठी फक्त रंगांची काडी नव्हती, तर ती तिच्या मैत्रिणीच्या प्रेमाचं, आपलेपणाचं प्रतीक होती. आणि जेव्हा सईनं ती शेअर करण्याऐवजी ‘‘देवीमातेला विचारते‘‘ असं सांगितलं, तेव्हा वैष्णवीला अनेक धक्के बसले.

‘‘तिचा मामा मोठ्या देशात राहतो, माझा नाही’’ ही भावना तिला स्वतःच्या मर्यादा जाणवून देते. ‘‘देवीमातेनं नाही म्हटलं’’ म्हणजे जणू तिच्या अस्तित्वालाच नकार मिळाल्याचा भास.

आणि विश्वासाला तडा ज्या सईवर ती जीव ओवाळून टाकत होती, तिच्याकडून आलेला नकार अधिकच बोचरा ठरला.

मुलांना वाटतं की जगातल्या प्रत्येक गोष्टीला एक उत्तर असतंच. पण जेव्हा त्यांना ‘‘का नाही?’’ या प्रश्नाचं उत्तर मिळत नाही, तेव्हा त्यांच्या भावनिक विकासाला वेगळं वळण लागतं. वैष्णवीला इथे जास्त त्रास पेन्सिल मिळाली नाही याचा नव्हता, तर ती तिच्या मैत्रिणीच्या निर्णय प्रक्रियेतून बाहेर टाकली गेली याचा होता.

बालमनाचं वैशिष्ट्य असतं की ते दुःख लगेच व्यक्त करतं. मोठ्यांसारखं ते दाबून ठेवत नाही. म्हणूनच वैष्णवी हमसून रडली. हे रडणं म्हणजे तिच्या आतल्या प्रश्नांचं पहिलं उत्तर होतं.

इथून पुढे पालकांची भूमिका महत्त्वाची ठरते. अशा प्रसंगी आपण मुलाला ‘‘काही हरकत नाही, दुसरी पेन्सिल घेऊ’’ असं सांगून शांत केलं, तर त्याच्या प्रश्नांना उत्तरं मिळतात; पण खरी जिज्ञासा शमली जात नाही. मी तिला समजावलं

प्रत्येकाकडे वेगवेगळ्या गोष्टी असतात, मैत्रीत कधी कधी नकारही मिळतो, पण त्या नकारातून आपण नातं कसं टिकवतो, हेच महत्त्वाचं

तर मुलांच्या मनात स्वतःचा स्वीकार आणि दुसऱ्याबद्दल समजूतदारपणा तयार होतो. या एका छोट्याशा पेन्सिलप्रकरणानं वैष्णवीच्या मनात प्रश्नांची, भावनांची, अपेक्षांची आणि दुःखाची नवी मालिका तयार केली. हेच बालजिज्ञासेचं सौंदर्य आहे . ती बाहेरून कितीही क्षुल्लक वाटली, तरी आतून ती मनुष्यस्वभाव समजून घेण्याचं पहिलं पाऊल असते.

आज दोघीही मैत्रिणी उच्चशिक्षित आहेत आणि आजही त्यांच्यातील मैत्रीचे बंध अधिक घट्ट आहेत.

# नमो दुर्गा नवरात्र महोत्सव दांडियाला प्रचंड प्रतिसाद !

ज्योतिर्मय साहित्य



**छत्रपती संभाजीनगर** – नमो दुर्गा दांडियाचे हे अकरावे वर्ष असुन सिडको हडको भागातील हे नामांकित दांडिया साठी प्रसिद्ध आहे. दरवर्षी महिला व मुली यांना मोफत दांडियासाठी राजीव गांधी एन ५ सिडको येथे उपलब्ध केल्या जाते.

उद्याचा शेवटचा दिवस असून दिनांक १ ऑक्टोबर सायंकाळी ७.३० ला हजारो महिलांच्या हस्ते महाआरती होणार आहे. या वेळेस हजारो महिला स्वतः आरती ताटे पारंपारिक साडी घालून देवी पुजा व आरती करतात. या मधुन सोडत पद्धतीने २१ पैठणी साडी मंडळाकडून दिल्या जाते. सर्व महिला भगिनी मुलींनी या उपक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन अध्यक्ष राहूल गाडीवान व कार्याध्यक्ष विलास कोरडे तसेच मंडळचे शिवाजी दांडगे, गणेश नवंदर यांनी केले आहे. म. ना. अतुलजी सावे यांचे मार्गदर्शन असलेले नमो दांडिया साठी उद्या सर्वांना मोफत प्रवेश असुन रात्री १२ पर्यंत दांडिया व भव्य बक्षिसे देण्यात येणार आहे.






## जात्यावरच्या ओव्या......

शिवाराच्या वाटा
थांबली फटफटी
बहिणीचं बाळ
आलं बाई भेटीसाठी ॥ २८१॥

शिवाराच्या वाटा
थांबला ग घोडा
बघून भाऊराया
जीव झाला येडा ॥२८२॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# आनंदघन : लता मंगेशकर




ज्योतिर्मय साहित्य

दीदींचं क्रिकेटप्रेम, त्यांची छायाचित्रणाची छायाचित्रणाची आवड या गोष्टी तर बहुतेक सर्वांना माहिती आहे. त्या उत्तमोत्तम पदार्थ करून घरच्यांना खाऊ घालतात. त्यात शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारचे पदार्थ त्या उत्तम करतात. पण यापेक्षाही काही वेगळ्या गोष्टी मला सांगाव्याशा वाटतात.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि दीनानाथ मंगेशकर यांचे अतिशय जवळचे संबंध होते. दोघांचेही एकमेकांकडे येणेजाणे होते. स्वा. सावरकरांच्या सहवासात येणारी प्रत्येक व्यक्ती त्यांच्या जाज्वल्य देशप्रेमाने भारून जात असे. दीदी लहान असताना त्यांच्याकडे जात असत. इतरांशी राजकारणावर तासनतास बोलणारे तात्याराव छोट्या लताशी तो विषय सोडूनच बोलत. ते आपल्या मुलीप्रमाणे तिला वागणूक देत. एकदा लताने स्वतःहूनच त्यांना विचारले की मी देशसेवा करण्यासाठी राजकारणात जाऊ का ? त्यावर ते म्हणाले, बेटा, तुला तुझ्या वडिलांप्रमाणे संगीताचा कान आहे. संगीत हा तुझा श्वास.. सूर हेच तुझं दैवत ! मग या देवतेचीच उपासना कर. हे सोडून तू राजकारणात पडू नकोस. स्वा. सावरकरांच्या या शब्दांचा दीदींवर एवढा प्रभाव पडला की त्यांनी तत्क्षणी राजकारणात येण्याचा विचार सोडून दिला तो कायमचाच आणि स्वतःला संगीतात वाहून घेतले.



त्यांच्या आईला म्हणजे माईला रहस्यकथा वाचण्याची आवड होती. ही आवडही लतादीदींकडे जणू वारशाने आली. त्यांना रहस्यकथा वाचायला आवडतात. सी आय डी ही त्यांची आवडती मालिका आहे. लतादीदी आणि पं भीमसेन जोशी या दोन भारतरत्न प्राप्त महान कलाकारांमध्ये गायन या कलेशिवाय आणखी एक साम्य आहे. ते म्हणजे दोघांनाही रहस्यकथा वाचायला आवडतात. पं भीमसेन जोशींची गायकी जेव्हा ऐन बहरात होती, तेव्हा त्यांना आपल्या दौऱ्यानिमित्ताने वारंवार विमान प्रवास करावा लागे. त्यामुळे पु. ल. देशपांडे त्यांना गमतीने हवाई गंधर्व म्हणत. अशा या हवाई गंधर्वांच्या बॅगेत रहस्यकथांची पुस्तके असत. बाबुराव अर्नाळकर हे त्यांचे आवडते लेखक. दीदींना त्यांची ही आवड माहिती होती. त्यामुळे जेव्हा केव्हा विमानतळावर त्या दोघांची भेट होई, तेव्हा दीदी त्यांच्याकडून हक्काने ती पुस्तके मागून घेत. तेही मग हसत हसत आपल्याजवळील पुस्तके काढून दीदींना देत असत.

दीदींना आलेला एक आगळावेगळा अनुभव. हा अनुभव दीदींनीच स्वतः हरीश भीमाणी यांना एकदा सांगितला आहे. हा अत्यंत खाजगी ( पर्सनल ) अनुभव असल्याने तो छापू नका असे स्वतः दीदींनीच त्यांना सांगितले होते. पण नंतर पुस्तक प्रकाशनाच्या वेळी त्यांनी या गोष्टीला काही आक्षेप घेतला नाही. दीदींना आपलं गाणं गाताना अनेकदा हा अनुभव आला आहे.

(क्रमशः)






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# मुमुक्षलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

अशा रीतीने जो स्वतः ची निंदा करतो, स्वतःचे असलेले दोष मान्य करतो. ज्याला मनांतून संसाराचा त्रास वाटतो. संसार नकोसा वाटतो, ज्याला सत्संगाची ऊत्कट इच्छा उत्पन्न होतेतो मुमुक्षु होय. पुष्कळ तिर्थे फिरून पाहिली,समाधीसाधने अभ्यासली अनेक ग्रंथाचे अभ्यास पूर्ण पारायणे केली तरी मनाला समाधान झाले नाही. हे सगळे बुद्धीचे अनुमान आहे, कल्पनेचा खेळ आहे असे समजले, हे लक्षात घेऊन संतांना शरण जाण्यास तयार होतो तो मुमुक्षु असतो.

सहा शमदमादि साधने.

१) शम शांतपणा २) दम इंद्रिय दमन ३) तितिक्षा सुखदु:ख पचवणे. ४) उपरति अनासक्ति ५) श्रद्धा किंवा शास्त्र सद्गुरूच्या वचनी विश्वास

६) सत्यबुद्धि आणि समाधान किंवा एकविध करण्याची कला देह, कुळ, द्व्यदारा आणि इतर गोष्टींचा अभिमान बाजूला सारून जो संतांच्या चरणीं अनन्य भावाने लीन होतो तो मुमुक्षु असतो.

आपला अहंभाव बाजूला सारून जो आपण स्वतः ला अनेकदा अनेक प्रकारची नावे ठेवतों व ज्याला मोक्ष हवा आहे असे वाटू लागतो तो मुमुक्षु असतो. ज्याला लौकिक मोठेपणाची लाज वाटते जो परमार्थासाठी झिजतो. संतचरणीं ज्याचा विश्वास बसतो. संतांबद्दल ज्याला आपलेपणा वाटतो तो मुमुक्षु असतो. प्रापंचिकाचे सर्व व्यवहार बंधने सोडतो व आचरण परमेश्वराच्या चरणाशी वहातो तो मुमुक्षु असतो.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ
समास आठवा समाप्त

# सत्समागम हा सर्व साधनांचा राजा !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

मनुष्यजन्माला येणे, संतांची भेट होणे आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास होणे या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही असे म्हणतात. सत्समागम म्हणजे सर्व साधनांचा राजा होय. काही मागण्याची इच्छाच संत नष्ट करतात, मग मिळवायचे कुठे राहते ? संत बनणे व्यावहारिकदृष्ट्या काही सुखाचे नसते. एखाद्या स्नानसंध्याशील आणि सदाचरणी माणसाच्या अंगावर तेज दिसते, कारण देहाला धरून झालेल्या कर्माचे ते तेज असते; पण एखाद्या सत्पुरुषाच्या देहावर बाहेर तसे तेज दिसणारही नाही. आत वावरणाऱ्या भगवंताच्या ज्ञानाला योग्य असा सत्पुरुषाचा देह असतो. देहाच्या आधाराने भोगण्याची या जगामधली जी सुखे आहेत, त्यांचे मार्ग सत्पुरुषापेक्षा आपण प्रापंचिक लोक जास्त जाणतो. परंतु देहाच्या पलीकडे असणारे आणि कायमचे टिकणारे, आणि देहाला विसरून आणि देवाला स्मरून जे मिळवायचे, असे भगवंताचे सुख आहे. ते प्राप्त होण्याचा मार्ग समजावून घेण्यासाठी आपण सत्पुरुषाकडे गेले पाहिजे. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. असा जो असेल तोच संत, नव्हे, प्रत्यक्ष भगवंत होय. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. संत आपल्याला सत्यस्वरूपाची ओळख करून देतात. सत्पुरुषाने आखून दिलेल्या मार्गाने कायावाचामनाने जे कर्म केले जाते ते पौरुषच होय.

आगगाडीत बसणारी सर्व माणसे, मग ती कोणत्याही क्लासमध्ये बसणारी असोत, इतकेच नव्हे तर बिनतिकिटाची माणसेदेखील, गाडीबरोबर सरळ म्हणजे शेवटच्या स्टेशनापर्यंत जाऊन पोहोचतात; त्याचप्रमाणे संतांची संगत करणारी सर्व माणसे भगवंतापर्यंत पोहोचतात. त्यांच्यामधली बिनतिकिटाची, म्हणजे दुष्ट, पापी, दुराचारी, त्याज्य आणि अयोग्य अशी माणसेसुद्धा तरून जातात; मात्र कोणीही गाडी तेवढी सोडता कामा नये. हाच सत्संगतीचा महिमा. परमार्थ साधण्यासाठी सत्संगती फार उपयोगी पडते. ही संगती तीन प्रकारची असते : एक, संताचा प्रत्यक्ष देहामध्ये सहवास; दोन, संताने सांगितलेल्या मंत्राचा सहवास; आणि तीन, संताच्या विचारांची संगत. संगतीचा परिणाम नकळत होतो, म्हणून सत्संगती धरावी. आपण ज्याकरिता जन्माला आलो ते कारण फक्त संतच उमगले; म्हणून त्यांना शरण जावे. संत स्वत: समाधान मिळवून ते दुसऱ्याला देतात, हे त्यांचे आपल्यावर केवढे उपकार आहेत ! संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते ?

ज्योतिर्मय साहित्य

असे सदबुद्धी असलेले सिद्ध पुरुष अनेको अनेक निर्माण व्हावेत. त्यांच्या प्रभावातून दृष्टांचा दुष्टपणा कमी व्हावा सर्व भूतमात्रात परस्परात स्नेह निर्माण व्हावा. ही मंगल कामना आणि तशी आग्रही मागणी भगवान श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी आपली अनंत जन्माची तपसाधनेचे तेज पणाला लावून हे पसायदान मागून घेतलेले आहे. असे सुबुद्धी असलेले म्हणजेच बुद्धी योगी सिद्धपुरुष निर्माण होण्यासाठी त्यांना सिद्ध करून घेणारे, समर्थ सद्गुरु तितक्याच मोठ्या प्रमाणावर लागणार आहेत, म्हणून भगवंताला त्यांनी अशा सिद्ध पुरुषांचे जथेच्या जथे लोककल्याणासाठी आणि बुद्धी योगी सिद्ध पुरुष घडविण्यासाठी जनसामान्यात पाठवावेत ही आग्रहाची विनंती केली आहे. आणि तसा आदेश या महारावानी म्हणजेच ज्ञानेश्वर महाराजांनी इतर सिद्धांना दिला आहे. असे सिद्ध पुरुष निर्माण झाल्यानंतर त्यांच्या प्रभावाने राग द्वेष मोह अभिनिवेष हे क्लेश क्षिण होतील. आणि समाज सत्वगुण प्रधान व्हायला मदत होईल. म्हणजेच पर्यायाने या समाजाचे अध:पतनापासून रक्षण होईल.

आता आपणास कळाले असेल की ज्ञानेश्वर महाराज यांनी ही ज्ञानेश्वरी या जगताचे अध्यपतनापासून कसे रक्षण करील याचा वस्तू पाठ या ग्रंथातून दिला आहे.यात अनेक दिव्य प्रयोग दिले आहेत. साधकांनी ते प्रयोग स्वतःची पात्रता वाढवून आणि श्री गुरुच्या कृपेने मिळवायचे असतात. आणि पूर्णत्वास न्यायचे असतात.

अशा रीतीने ज्ञानेश्वरी हा ग्रंथ निश्चितच या कलि युगाला अध:पतनापासून वाचविणारा महान ठेवा आहे. यात किंचितही शंका नाही.

सिद्ध पुरुषांचे सामर्थ्य कसे असते हे जाणण्यासाठी नुकतेच आळंदी येथे केलेला एक प्रयोग लक्षात घेण्यासारखा आहे.

काही लोकांना असे अनुभवास आले की ज्ञानेश्वर माऊलीची समाधी असणाऱ्या आळंदीच्या परिसरात कितीही लोक येवोत त्यांच्यात सद्भाव, भक्ती जागृत होते. विकारांना थोडासा लगाम लागतो. हे याच क्षेत्रात आल्यावर कसे काय घडते ?हा प्रश्न पडला. काही लोकांनी वैज्ञानिक प्रयोग करून पहावे म्हणून अल्फा रेज चा संदेश टिपणारे उपकरण आणले आणि त्यांच्या हे लक्षात आले की, माऊली च्या समाधी स्थानापासून दहा किलोमीटर वर हवेत आणि २२ किलोमीटर रुंद परिसरात सर्वत्र अल्फा रे चा प्रभाव दिसून आला.

समाधी अवस्थेत जेव्हा योगी असतो ,तेव्हा ही दिव्य किरणे त्याच्या मस्तकातून बाहेर प्रस्फुटीत होत असतात,

आणि त्यांच्या संपर्कात जो कोणी येईल, त्याचा रजो गुण आणि तमोगुण कमी होऊन, सत्वगुण प्रभावशाली होऊ लागतो.

माऊली समाधीस्थ होऊन आज साडेसातशे वर्षे झाली. आजही इतक्या प्रचंड प्रमाणात अल्फा रे चा वर्षाव समाधी स्थानातून बाहेर पडतो आहे. तर ज्यावेळेस माऊली प्रत्यक्ष देहानीशी हजर होते, त्यावेळेस त्यांचा प्रभाव किती दूरपर्यंत जात असेल?ज्ञानेश्वरीत दिलेले दिव्य प्रयोग हे गुरूच्या मुखातून त्यांच्या आज्ञेने प्रत्येकाने कसोशीने करावेत व स्वतः विकसित होण्या सोबतच अवती भवतीचा संपूर्ण परिसर सत्व गुण प्रधान करून या देशाला सुजलाम सुफलाम करण्याकडे वळावे ही इच्छा व्यक्त करून हा भाग इथेच संपवितो.

****

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

नेत्रज्योतिश्च मे तत्र स्थापिता दीपिका हि सा।
देहः पुलकितो धूपः पूजोपकरणे खलु।।९६।।

माझी नेत्रज्योती म्हणजे तेथे स्थापन केलेली ती दीपिकाच होय. पुलकित झालेला देह म्हणजे खरोखर तुझ्या पूजोपकरणातील धूपच होय.

अभिषेकं करोमीति नयनधारया मम।
गायामि तव सूक्तं तद् समये परमं शिवम्।।९७।।

माझ्या नयनधारांनी तुझा अभिषेक करतो. त्यावेळी तुझे श्रेष्ठ व पवित्र सूक्त मी गातो.

शर्करा तत्र भक्तिर्मे नैवेद्यं ते समर्पये।
भाग्यलिखितपर्णं हि ताम्बूलं ते समर्पये।।९८।।

माझ्या भक्तीरूपी शर्करेचा नैवेद्य तुला अर्पण करतो. भाग्य ज्यावर लिहिले आहे, ते तांबूल तुला समर्पित करतो.

प्राणपञ्चकदीपेनैव तवौक्षणं करोम्यहम्।
मम यद् सुमनस्तदेव ते पादयुगलेऽर्पये।।९९।।

पंचप्राणरूपी दीपकांनी तुझी आरती करतो. माझे मनरूपी पुष्प तुझ्या चरणयुगली समर्पित करतो.



# आरोग्य संजीवनी

## रक्ताभिसरण संस्थेचे शुद्धीकरण गरजेचे आहे, कारण...

ज्योतिर्मय साहित्य

१) जेवणाच्या लगेच आधी, जेवतांना मध्ये-मध्ये आणि जेवणानंतर लगेच पाणी प्यायचे नाही. कारण त्यामुळे जठराग्नी विझते, पाचक रस पातळ होतात त्यामुळे खाल्लेले अन्न पचत नाही. त्यामुळे जेवणाच्या किमान आर्धा तास आधी आणि जेवणानंतर एका तासानेच पाणी प्यावे.

२) पुरेसे आणि शिस्तबद्ध पद्धतीने पाणी प्यावे - पुरेसे म्हणजे २० किलो वजनाला १ लिटर पाणी लागते म्हणजेच ६० किलो वजन असेल तर ३ लिटर पाणी आवश्यक आहे, अती नको वा कमीही नको. शिस्तबद्ध पद्धतीने म्हणजे पाणी नेहमी बसून प्यावं, उभं राहून पिऊ नये. पाणी नेहमी ग्लास तोंडाला लावून प्यावं, वरुन पिऊ नये. आणि महत्वाचं म्हणजे पाणी चावून खावे म्हणजे गटागट न पिता जास्तीत जास्त लाळ मिसळून सावकाश पिलं पाहिजे कारण लाळ अल्कलाईन (क्षारीय) असते, ती दर मिनिटाला साधारण ०.५ बनत असते, ती जास्तीत जास्त पाण्यासोबत पोटात जाणे गरजेचे असते. कारण त्यामुळे पोटातील ॲसिडीक वातावरण नॉर्मल (सामान्य) व्हायला मदत होते आणि पोटातील ॲसिडीक वातावरण जेवढं नॉर्मल (सामान्य) होईल तेवढं वात-पित्त-कफ संतुलित राहून आपण निरोगी राहतो.

पाणी पुरेसे आणि शिस्तबद्ध पिण्यात आलं तरच किडनी ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते.

३) जागरण टाळणे - रात्री १० च्या आत झोपलंच पाहिजे. कारण रात्री १० च्या आत झोपलं तरच आपण रात्री ११ ते ३ या वेळेत गाढ झोपेत असू आणि या वेळेत गाढ झोपेत असलो तरच यकृत () ही गाळणी व्यवस्थितपणे शरीरशुद्धी करते, अन्यथा शरीरशुद्धी व्यवस्थित होत नाही.

४) सुर्यास्तानंतर शक्य तितके लवकर जेवावे - सुर्यास्तानंतर आपली जठराग्नी शांत व्हायला लागते. त्यामुळे सुर्यास्तानंतर शक्य तितक्या लवकर जेवावे. खरं तर सुर्यास्तानंतर काहीच खाल्लं नाही पाहिजे. पण आपल्या लोकांचा स्वयंपाक लवकर होत नसल्याने सुर्यास्तानंतर किमान शक्य तितक्या लवकर तरी जेवावे.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

५) रात्री जेवलं की लगेच झोपणं टाळावे - जेवलं की लगेच झोपलं तर खाल्लेले पचत नाही आणि न पचलेलं सडून विषारी द्रव्ये (टोक्सिन्स) तयार होतात. त्यामुळे रात्रीचं जेवण आणि झोपणं यामध्ये २-३ तासांचे अंतर अवश्य असावे.

६) ताण-तणाव (स्ट्रेस) टाळावा - ताण-तणावांमुळे शरीरात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात. त्यामुळे ताण-तणाव नियंत्रित राहण्यासाठी नियमितपणे व्यायाम व ध्यान (मेडिटेशन) करावे.

७) विरुद्ध आहार टाळावा - विरुद्ध आहार शक्यतो दूध-दही याबाबतीत घडतो. जेवतांना दूधाची खिर खाऊ नये किंवा जेवणानंतर लगेच दूध पिऊ नये. कारण दूधात मीठ टाकलं तर दूध नासते, मग जेवणात मीठ असतेच त्यामुळे जेवतांना किंवा जेवणानंतर लगेच दूध पिलं तर दूध नासण्याची प्रक्रिया पोटात चालू होते आणि त्यामुळे पोटात रासायनिक प्रक्रिया घडून विषारी द्रव्ये तयार होतात म्हणून याला विरुद्ध आहार म्हणतात.

तसेच दही रात्री खाणंही विरुद्ध आहार आहे कारण दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) आपल्या शरीरात दुपारीच बनत असतात त्यामुळे दही दुपारीच खावे. रात्री दही पचवण्यासाठीचे पाचक रस (एंझ्याम्स) बनत नसल्यामुळे रात्री दही पचत नाही उलट सडून विषारी द्रव्ये तयार होतात त्यामुळे याला विरुद्ध आहार मानलं जातं.

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

त्यावर चक्रवाक पक्षी म्हणाला मी रामा सारखा मूर्ख नाही. त्याने मृग कांचन या अशक्य प्राण्याच्या साठी आपल्या पत्नीला संकटात टाकले. त्याचे हे बोलणे ऐकून रामाला राग आला व त्यांनी या जोडीला असा शाप दिला की तुझा पत्नी पासून वियोग होईल. चक्रवाक हीस ही वाणी ऐकून अत्यंत वाईट वाटले ती प्रभुरामास शरण गेली. ती म्हणाली. ‘‘यांना बोलायचे कळत नाही‘‘.माझा तरी तुमच्याबद्दल करूण भाव होताना?ती म्हणे हे चुकले मग मला का शिक्षा? राम म्हणाले तुला उ:शाप देतो. तुम्ही दिवसा एकत्र याल.रात्री नाही.रात्री ते आरडा ओरडा करतात.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

सरस पक्षी व त्याची पत्नी हे कायम बरोबर राहतात व विरह झाला की मरुन जातात.

सारस पक्षाच्या पत्नी जीला लक्ष्मणा असेही नाव आहे. एकदा लक्ष्मणा चक्रवाकीला म्हणाली तुम्ही वेगळे होऊन कसे जगू शकता?ती म्हणे आमचे प्रेम उत्कट.आहे.चक्रवाकी म्हणे अगं वियोगात सुद्धा प्राण टिकवून ठेवणे किती अवघड असते तुला काय कळणार ? हनुमान म्हणे .सीता त्यांचे प्राण तुमचे दर्शन होई तोवर जाणार नाहीत. कुंभकर्ण अनेक वानराना मुठीत घेऊन चक्क खायला लागला.अनेक वानर मारायला लागले.मग कुंभकर्णाला मारले.मग इंद्रजीत लढायला आले. लक्ष्मण बेहोश झाले हनुमंताने द्रोणागिरी उचलून नेला. रस्त्यात भरताला असे वाटले की हा रामाला लढायला जात आहे.त्याने मारुतीला बाण मारला.ते खाली उतरले व परिस्थिती सांगितली.भरताला आनंद झाला. (क्रमशः)

# आझाद हिंद सरकारचे खरे सैनिक-शाह नवाझ खान

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

आझाद हिंद सेनेमध्ये धर्म, जात आणि भाषेचा कोणताही भेद नव्हता. हे लष्कर अखिल भारतीय मुल्यांचे प्रतिक होते. ''चलो दिल्ली'' हे सेनेचे घोषवाक्य होते. आझाद हिंद सेनेची () भारतात प्रवेश करण्याची योजना शांतीपूर्ण आणि अस्त्रधार मुल्यांची शिकवण तसेच इंग्रजी राजवटीचा नाश करण्याचा दृढ निश्चय हेच लक्ष होते. प्रत्येक सैनिकाच्या मनात हा विश्वास ठामपणे रोवलेला होता. ब्रिटीशांच्या सैन्याच्या विरोधात आझाद हिंद सेनेने () मणिपूर, नागालँड, इम्फाळ, कोहिमा, अंदमान, निकोबार आणि बऱ्याच सीमावर्ती भागात लढाई केली. शाह नवाज खान यांच्या युद्धकौशल्यामुळे नेताजींनी त्यांना सैन्याच्या दुसऱ्या विभागाचे कमांडर म्हणून नेमले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ईशान्य भारतात कोहिमा आणि इंफाळ ताब्यात घेण्यात आले होते. ब्रिटीश लष्कराची दाणादाण करीत हा प्रदेश बराच काळ आझाद हिंद सेनेच्या ताब्यात होता. डिसेंबर १९४४ मध्ये शाह नवाझ खान यांना मंडाले येथे पहिल्या डिव्हिजनचे कमांडर म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

१९५२ मध्ये पहिल्यांदा शाह नवाझ खान मेरठमधून कॉंग्रेसच्या संघटनेतून लोकसभेवर निवडून आले. पुढील २३ वर्षे त्यांनी राजकारणात, प्रशासनात विविध मंत्रीपदावर चार वेळा खासदारकीला




निवडून येऊन कार्य केले. रेल्वे, कृषी, श्रम, पोलाद आणि खनीज आणि विविध विभाग मंत्री पद म्हणून सांभाळले. १९५६ मध्ये भारत सरकारने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मृत्यूच्या परिस्थितीचा शोध घेण्यासाठी शाह नवाझ खान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली. या समितीमध्ये नेताजी यांचे मोठे बंधू सुरेशचंद्र बोस यांचा समावेश होता. समितीने एप्रिल १९५६ मध्ये आपले काम सुरू केले आणि चार महिन्यानंतर तीनपैकी दोघांनी सुरेशचंद्र बोस वगळता असा निष्कर्ष काढला की, १८ ऑगस्ट १९४५ रोजी फॉर्मोसा (आता तैवान) येथील तैहोकू (तैपई) येथे झालेल्या विमान अपघातात नेताजी यांचा मृत्यू झाला. त्यांनी असे म्हटले की, नेताजी यांच्या अस्थी जपानच्या रेनकोजी मंदीरात ठेवण्यात आल्या आहेत आणि त्या भारतात हलविल्या पाहिजेत.

शाह नवाझ खान यांचे ९ डिसेंबर १९८३ रोजी निधन झाले. त्यांना दिल्लीतील लाल किल्ला आणि जामा मशिदी जवळ असलेल्या बागेत राज्य सन्मानाने दफन करण्यात आले. हे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महत्त्वाचे




घटनास्थळ आहे. त्यांचे शव मेरठहून दिल्ली येथील लाल किल्ला येथे आणण्यात आणले. राजीव गांधी यांनी त्यांच्या शोकयात्रेचे नेतृत्व केले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्यांच्या निधनावर देशातील न विसरता येणारे अवर्णीय व्याक्तिमत्व असे म्हंटले. इंदिरा गांधीसह मंत्रीमंडळ तसेच देशातील सर्व राजकीय पक्षातील नेते या अंत्यसंस्कारासाठी उपस्थित होते. लाल किल्ल्याजवळ त्यांचे दफन म्हणजे भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला आणि त्यांच्या वीरांना असलेला आदर आणि श्रद्धा व्यक्त करणारा इतिहासाचा भाग आहे. लाल किल्ला परिसरातील दफनाची परंपरा ही भारताच्या स्वातंत्र्य, संघर्ष आणि राष्ट्रभावनेचा सशक्त नमुना आहे. येथे दफन होणारी व्यक्ती फक्त एखाद्या कुटुंबाचेच नाही तर संपूर्ण देशाचे प्रेरणास्रोत मानले जातात. या परिसरात केलेल्या अंत्यसंस्काराला राष्ट्रीय, सामाजिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अगदी उच्च स्थान आहे. शाह नवाझ खान यांच्या जीवनावर १९८७ साली भारतीय चित्रपट विभागाने लघुपट निर्माण केला आहे.

जो एस.एस. बांदेकर यांनी दिग्दर्शीत केला आहे. या लघुपटात त्यांचे जीवन आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्यांच्या योगदानाचे चित्रण दाखविण्यात आले आहे.

***

# स्त्रीचा सन्मान करा !

**ज्योतिर्मय साहित्य**

नाती टिकविण्यासाठी समंजसपणाची, भावनात्मकतेची गरज असते. विवाहित स्त्रियांची खूपच कुचंबणा होते, या सारख्या गडबडीत त्या स्वतःचे अस्तित्व विसरुन बसतात. आणि शेवटी एकटेपणाचे निराशा आयुष्य त्यांच्या वाट्याला येते.

जर वेळीच या गोष्टींकडे लक्ष दिले गेले नाही तर, सुशिक्षित असलेली सून ही अशा घरात टिकत नाही, जर तिला कोणी समजूनच घेतले नाही तर ती मानसिक आणि शारीरिक आरोग्याची शिकार होऊ शकते, आणि जर पती समजूतदार नसेल, तोच जर आपल्या पत्नीला वेळ देत नसेल, किंमत देत नसेल, इतरांच्या सांगण्यावरुन स्वतःच्या पत्नीला तुच्छ मानत असेल तर त्याची पत्नी ही फक्त नाईलाजाने, शरीराने त्या घरात रहात असेल, पण तिला मायेचे, प्रेमाचे दोन शब्द ही मिळणार नसतील तर तिचे आयुष्य नरकासमानच असते. नाती टिकविण्यासाठी दोन्ही बाजूंनी एकमेकांचा विचार, संभाषण, सुसंवाद साधले पाहिजेत.



स्वप्न गंधा सतीश आंबेतकर
मुंबई. विरार.

जेव्हा सासरी गेलेल्या मुलीला परके समजून सतत टोमणे मारणे, तिच्या चुका दाखवणे माहेरच्यांचा उद्धार करणे, तिच्या कोणत्याही चांगल्या गुणांचे कौतुक न करता ती कशी आणि कुठे चुकते, तिला कसे काही जमत नाही हे दाखविण्याचा सासरच्या माणसांचा मोठा हात असतो, आणि अशावेळी तिचा नवराही तिला साथ देत नसेल तर ती मुलगी एकतर आत्मविनाशाला प्रेरित होते, नाहीतर संपूर्ण आयुष्य त्या आगीत होरपळत बसते व आपले आयुष्य संपवते.

तिला जर माहेरचा आधार नसेल तर अशा घटना हमखास घडतातच. तर नाती टिकवायची असतील तर बाहेरुन आलेल्या परक्या मुलीला पहिली आपली लेक मानायला शिकलात तर सार्या गोष्टी आपसुकच सुरळित होतील. जमाना बदलला आहे, आता पूर्वी सारख्या स्त्रिया चूल आणि मूल करणार्या राहिल्या नाहीत, त्यांच्यासमोर नवी स्वप्ने, नव्या महत्वाकांक्षा आहेत. पण त्यांच्या स्वप्नांचा इथेच चुराडा झाला तर त्या धुमसत्या आगीत ना कोणाचे भले होणार असते, ना कुणी



सुखी राहणार असते, पण हे कळणार कोणाला जे वाचन करतील, समंजस असतील त्यांनाच या गोष्टी पटतील, ज्याच्या घरात सून ही एक आपली हक्काची व्यक्ती की, जिने कायम आपल्या दबावाखाली रहावे अशी वागणूक असेल तर ना ते कुटुंब कधी पुढे जाणार, ना ती मुलगी तिथे आनंदाने संसार करणार.

यासाठी तिचा पती परमेश्वरच जबाबदार असू शकतो, त्यानेच जर आपल्या पत्नीला सन्मानाची आदराची वागणूक दिली नाही तर ती मुलगी ही त्या घरात कधी रुळला नाही. तरी पतींनो, आपल्या गृहलक्ष्मीला सन्मानाची, प्रेमाची वागणूक आपणच दिली, आणि पत्नी, सहचारिणी, मैत्रीण, प्रेयसी अशा भूमिकेतून तिचे संरक्षण आणि स्वीकार केला तरच तुमचा संसार सुखाचा होईल. नात्याची वीण घट्ट होईल. रेशीम गाठींची गाठ अधिक जुळेल, नाते अधिक फुलेल व या नात्याला प्रेमाचा सुगंधी सहवास मिळेल. कुटुंबात छान एकोपा राहून घराण्याचे नाव उज्ज्वल होईल. आज जागतिक कन्या दिनाच्या निमित्ताने हे प्रयोजन. ठरलं तर मग! प्रत्येक विवाहित कन्येच्या मागे सासरचे कुटुंब प्रेमाचे नाते जपेल, व सर्व कुटुंबे आनंदाने, एकत्र नांदतील. कन्या दिनाच्या शुभेच्छा.

# 'मना'चे श्लोक' - कुटुंब, प्रेम आणि मैत्रीची रंगतदार कहाणी

**ज्योतिर्मय साहित्य**

टीझर आणि गाण्यांमुळे आधीच चर्चेत असलेला 'मना'चे श्लोक' आता ट्रेलरमुळे आणखीच रंगला आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर लाँच सोहळा संपन्न झाला. यावेळी चित्रपटाच्या टीमकडून पूरग्रस्तांना अडीच लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली.

ट्रेलरमध्ये श्लोक-मनवाची केमिस्ट्री, त्यांच्या घरच्यांची मजेदार धावपळ आणि स्थळांच्या गंमतीजंमती ट्रेलरमध्ये पाहायला मिळतात. श्लोकच्या घरच्यांनी त्याच्यासाठी मुलगी शोधायला सुरुवात केली आहे, तर मनवासाठी तिचे कुटुंबही स्थळं पाहात आहे. या सगळ्या गडबडीत त्या दोघांच्या स्वप्नांचे काय होणार, ते दोघं एकत्र येतील का, लग्नासाठी तयार होतील का, याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. ट्रेलरमध्ये हसू, गोडवा आणि भावनिक क्षण एकत्र पाहायला मिळतात.

दिग्दर्शिका मृण्मयी देशपांडे म्हणतात, ''हा फक्त श्लोक-मनवाचा प्रवास नाही तर त्यांच्या कुटुंबांचाही आहे. यात नाती, प्रेम, मैत्री आणि मजाही आहे. प्रेक्षकांना हे सगळं आपलं वाटेल आणि ते रंगून जातील.''

प्रस्तुतकर्ता नितीन वैद्य म्हणतात, ''ही आजच्या काळातील प्रेमकथा आहे, तरीही त्यात कुटुंबाची चौकटही आहे. ट्रेलरमुळे लोकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत आणि उत्तरं लवकरच चित्रपटात मिळतील.''

निर्माते संजय दावरा म्हणतात, ''यातील प्रसंग सगळ्यांच्या घरात घडतात. घरातील छोट्या छोट्या गंमती, अनपेक्षित वळणं आणि त्यातून उलगडणारी मजेशीर कथा प्रेक्षकांना नक्कीच आपलीशी वाटेल.''

चित्रपटात मृण्मयी देशपांडे, राहुल



पेठे, पुष्कराज चिरपुटकर, सुव्रत जोशी, सिद्धार्थ मेनन, हरीश दुधाडे आणि करण परब अशी तरुणांची तगडी फळी आहे. तसेच लीना भागवत, मंगेश कदम, शुभांगी गोखले आणि उदय टिकेकर हे ज्येष्ठ कलाकारही महत्वाच्या भूमिकेत दिसतील.

'मना'चे श्लोक' हा चित्रपट १० ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार असून याचे लेखन-दिग्दर्शन मृण्मयी देशपांडे यांनी केले आहे.

निर्माते श्रेयश जाधव आणि संजय दावरा असून, चित्रपट स्टारलाईट बॉक्स थिएटर्स आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन्स यांच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे.

# गणेश तोटे ह्याची जागतिक पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

**सासवड** - वाघिरे महाविद्यालय, सासवड येथे एम.ए. राज्यशास्त्र प्रथम वर्षात शिक्षण घेत असलेला खेळाडू गणेश संजय तोटे याची १० ते १६ नोव्हेंबर २०२५ दरम्यान क्लुज-नापोका या रोमेनिया देशातील शहरात होणाऱ्या जागतिक पॉवर लिफ्टिंग स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. ह्या यशाबद्दल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सहाय्यक क्रीडा संचालक डॉ.सुदाम शेळके यांच्या हस्ते गणेश तोटे ह्याचा सन्मानचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ व फकिरा ही कादंबरी देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा.प्रितम ओव्हाळ, सहाय्यक कक्षाधिकारी किशोर घडीयार व राष्ट्रीय खेळाडू प्रतिभा लोणे उपस्थित होते.

सत्कार प्रसंगी बोलताना डॉ.सुदाम शेळके यांनी, ''सर्वसामान्य खेळाडूंच्या संघर्षाच्या काळात त्यांच्या सोबत समाजातील प्रत्येक घटकाने उभे राहणे गरजेचे आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, प्रकुलगुरू, व्यवस्थापन मंडळ व क्रीडा विभाग कायम खेळाडूंच्या हिताचे निर्णय घेत आहेत, त्यामागे खेळाडूंनी जागतिक स्तरावर भारताचे नाव मोठे करावे हाच हेतू आहे.'' असे मत व्यक्त केले.



दावणगेरे, कर्नाटक येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत एकूण ८७५ किलोग्रॅम वजन उचलून १०५ किलोग्रॅम खालील वजन गटात गणेश तोटे ह्याने आपले स्थान निश्चित केले. पॉवर लिफ्टिंग इंडियाने त्याची निवड जाहीर केली आहे. मूळ भिंगरी पनवेल येथे राहणारा गणेश तोटे गेल्या आठ वर्षांपासून फिटनेस ऑन जिम येथे पॉवर लिफ्टिंग खेळाचे प्रशिक्षण घेत आहे.

भारतीय संघात स्थान मिळविल्याबद्दल त्याचे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड.संदीप कदम, खजिनदार ॲड. मोहनराव देशमुख, उपसचिव एल.एम.पवार, सहसचिव प्रशासन ए.एम.जाधव, क्रीडा अधिकारी श्याम भोसले आदी मान्यवरांनी अभिनंदन केले. सदर यशाचे श्रेय त्याने आई व वडील, प्रशिक्षक विशाल मुळे, प्रमोद पवार, वाघिरे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित शेळके व शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक प्रा.प्रितम ओव्हाळ यांना दिले आहे. या प्रसंगी जागतिक स्पर्धेत भारताला सुवर्ण पदक मिळवून देण्याचा निश्चय त्याने बोलून दाखविला.










# जीवन प्रवास

**ज्योतिर्मय साहित्य**



एकदा मी दिवाळी साठी औरंगाबादहून परभणीला ट्रेनने जात होतो. नेहमीसारखी रेल्वेत प्रचंड गर्दी होती. मी रेल्वेत कसाबसा चढलो. गर्दीमुळे आणि मागून ढकलणाऱ्या लोकांमुळे आरक्षित सीट वर बसताना माझ्या हातातील बॅगचा धक्का तेथे बाजूला आधीच बसलेल्या आजोबांना लागला. मी त्यांना लगेच सॉरी म्हणालो, तेंव्हा ते म्हणाले अरे बेटा त्यात एवढं काय? मला फार काही लागले नाही. आणि तू काही मुद्दाम बॅगने मारलं नाहीस. तेंव्हा मी त्यांना म्हणालो, आजोबा, तुम्ही थोडेही रागावला नाहीत. हे थोडं विलक्षण वाटलं. तेंव्हा ते म्हणाले अरे, हा प्रवास खूप छोटा आहे.

एका निमित्ताने आपण एकमेका शेजारी आलो आहोत येथे, अगदी काही वेळेसाठी. मी तर एक तासात येणाऱ्या जालन्याला उतरणार आहे,तेंव्हा तुझ्यावर राग करून भांडण का करू ना? किती छोटा प्रवास आहे ना हा? त्यांचे म्हणणे मला ही पटले, आणि मग काही वेळ आमच्या गप्पा झाल्या एक तास कसा गेला? हे कळले नाही. जालना जवळ आले असताना, मी त्यांची बॅग घेऊन त्यांना उतरताना मदत करावी म्हंटले, तर तेव्हा ते म्हणाले, अरे पण मला कोण किती दिवस पुरणार आहे? मी नेहमी अतिशय कमी, मला उचलेल एवढेच कामापुरते सामान घेऊन फिरत असतो एकटा. अरे, माणूस एकटा येतो आणि एकटाच जातो. येताना बंद मुठींनी येतो आणि जाताना मुठी उघड्या ठेवून जातो. हे हेच सांगते कि आपल्या सोबत जाताना काहीही येणार नाही, कोणीही येणार नाही मग कुठलीही , कश्याचीही जास्त हाव कशाला? एवढ्या गप्पा होईपर्यंत जालना आले. ते आजोबा खाली उतरले. खिडकीच्या बाहेरुन मला हात दाखवून प्रसन्नतेने निघून गेले. पण त्यांनी बोललेले शब्द मला खूप काही शिकवून गेले. अरे हा प्रवास खूप छोटा आहे. आणि मग मी जीवन प्रवासाच्या विचारात गुंतलो. जालना ते परभणी येईपर्यंत माझ्या मनात अनेक विचार घोळत होते.




खरंच आपला जीवन प्रवास किती छोटा आहे. माणूस आज आहे तर उद्या नाही अश्या बातम्या ही अधून मधून कानावर येत असतात. मग हा प्रवास छोटा असताना का कुणाशी? भांडण, राग, मनात द्वेष असावा? पैसा, संपत्ती, स्वार्थासाठी की पद, प्रतिष्ठा, नावासाठी ? हे जे सोबत काहीच येणार नाही, त्या करता माणूस नावाचा अती हुशार प्राणी का एकमेकात कटूता आणतो?

छान समाधानाने जगत, एकमेकांना मदत करत, दुःखात धावत जात, सुखात आनंद व्यक्त करत हा छोटा असलेला जीवन प्रवास जर प्रसन्नतेने ,मुक्तपणे व्यक्त होत, नाते, मैत्री, स्नेही शेजारी, सहकारी आणि घर परिवार सांभाळत केला तर या प्रवासा एवढा आनंद कुठेच नसेल ना?



**या देवी सर्वभूतेषु शक्ति-रूपेण संस्थिता।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।**



# चांदवड नाशिकची श्री रेणुका माता

**ज्योतिर्मय साहित्य**

संपूर्ण महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेले राजराजेश्वरी कुलस्वामिनी श्री रेणुका मातेचे प्राचीन, जागृत व प्रसिध्द देवस्थान नाशिक जिल्हयातील चांदवडला आहे. चांदवडला निसर्गाचा वरदहस्त लाभलेला आहे. चांदवडची ओळख श्री रेणुकादेवी मंदिर अशीच आहे. चांदवड शहराच्या उत्तरेला मुंबई-आग्रा महामार्गावर १ ते १.५ किमी वर तांबकडा डोंगराच्या कुशीत रेणुका देवीचे आकर्षक असे मंदिर आहे.

श्री रेणुका मातेचे हे मंदिर सहयाद्री पर्वतरांगेतील निसर्गरम्य परिसरातील टेकडीच्या गुहेत वसलेले आहे. नाशिक जिल्हयातील धार्मिक स्थळांपैकी एक सुप्रसिध्द देवस्थान असल्याने भाविकभक्तांची दर्शनासाठी बाराही महिने वर्दळ असते. शारदीय नवरात्रोत्सव व चैत्र पौर्णिमेला भाविकांची प्रचंड गर्दी असते.

बहुसंख्य मंदिरांना काहीतरी आख्यायिका आहे तसेच या मंदिराचीही आख्यायिका आहे. श्री जमदग्नी ऋषींच्या आज्ञेनुसार पुत्र परशुरामाने स्वताच्या आईचे शीर धडा वेगळे करून पितृ आज्ञेचे पालन केले होते. त्यावेळी देवीच्या धडाचा भाग माहूर (ता. किनवट जी. नांदेड) येथे असून शीर चांदवड येथे आहे. अशी आख्यायिका आहे. त्यामुळे या देवीला महाराष्ट्राचे आराध्यदैवत म्हणून प्रसिध्द असलेली जगतजननी, चांदवड निवासीनी राजराजेश्वरी, कुलस्वामिनी श्री रेणुकामाता म्हणून ओळखले जाते.

या ठिकाणी भाविकांनी अर्पण केलेले सर्व नवस, आराधना माता पूर्ण करते. या भावनेने संपूर्ण राज्यातून व देशातून भाविक भक्त मोठ्या संख्येने दर्शनासाठी येथे येत असतात. पूर्ण झालेले नवस मोठ्या श्रद्धेने फेडतात. अश्विन शुद्ध प्रतिपदेपासून नवरात्रात १० दिवस व चैत्र पौर्णिमेला एक दिवस या ठिकाणी भव्य यात्रोत्सव असतो. या नवरात्र उत्सव काळात हजारो स्त्री, पुरुष मोठ्या श्रद्धेने मंदिराच्या गाभाऱ्यात व मंदिर परिसरात उपासना करतात. नवरात्रात दुर्गाअष्टमीला नवचंडी होमहवन होत असतो. या उत्सव काळात श्री रेणुका मातेच्या शृंगाराची विधिवत सकाळ व सायंकाळच्या वेळी संपूर्ण गावातून सवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात येते. तसेच दर महिन्यास असलेल्या पौर्णिमेला पालखी मिरवणूक काढण्यात येते.

जागृत असलेल्या रेणुका देवीचे रूप दिवसातून तीन वेळा बदललेले स्पष्टपणे दिसून येते प्रात:काळी बाला , मध्यांन्ही युवा आणि सायंकाळी वृध्दा अशी दिवसातली तीन रूपे देवीचा मुखवट्या वर स्पष्ट दिसतात.

इसवी सन १७४० च्या आसपास महाराणी अहिल्यादेवी होळकर यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केल्याचे समजते. शहराकडून मंदिराकडे जाताना महामार्गालगत एक छोटासा रस्ता लागतो त्या रस्त्याने मंदिराला जाण्यासाठी जुन्या दगडी पायऱ्या आहेत,त्या पायऱ्या चढून गेल्यावर मंदिराचे भव्य असे दगडी प्रवेशद्वार आहे. महामार्गावरून दिसणारे हे दगडी भव्य प्रवेशद्वार म्हणजेच चांदवडच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष आहे.पावसात तर प्रवेशद्वारातून आणि दगडी पायऱ्यांवरून खाली खळखळणारे पाणी मन मोहवून टाकते. प्रवेशद्वारातून आत गेल्यावर प्रशस्त पटांगण आणि भव्य मंदिर समोर दिसते.पटांगणात उंचच उंच अशा दोन भव्य दगडी दीपमाळा आपल्या स्वागतासाठी तयार असतात.मंदिराचे आवार खुप छान सुशोभित केले आहे.तिथुनच चंद्रेश्वर गडावरी चंद्रेश्वर महादेवांचे सुंदर मंदिर दिसते. प्रवेशद्वारा लागुनच एका बाजूला नव्याने दोन भक्त निवास बांधलेले आहेत आणि दुसर्या बाजूला दुकानां साठी व्यवस्था आहे. मंदिरात प्रवेश केल्यावर चारी बाजूंनी दगडी बांधकाम केलेल्या धर्मशाळा बांधल्या आहेत.मंदिराच्या छतावर कोरलेल्या चार-पाच शिलालेखांवरून असे वाटते की या धर्मशाळा १७७२ मध्ये बांधलेल्या असाव्यात.धर्मशाळांच्यामध्ये आणि गाभाऱ्याच्या






अगदी समोरच त्रिशूळ आणि तुळशी वृंदावन आहे.गाभाऱ्याच्या पूर्वेस पडवीत नंदी, महादेवाची पिंड, संगमरवरी छोटी देवी, पादुका, मारुती आहे.

१७३५ ते १७९५ कालावधीत मंदिराचा जीर्णोधार

ब्रिटीश कालीन सरकारच्या ताब्यात असलेल्या या पुरातन कालीन मंदिराचा जीर्णोधार पुण्यश्लोक देवी श्री अहिल्याबाई होळकर यांनी सन १७३५ ते १७९५ या कालावधीत केला आहे. या मंदिरात दीपमाळ, पायऱ्या, मुख्य दरवाजा, सभा मंडप, तीर्थ तलाव, आदीचे बांधकाम केले आहे. श्री अहिल्याबाई होळकर या त्यावेळी भुयारी मार्गाने पालखीत बसून श्री रेणुका मातेचे अलंकार व पूजापाठ साहित्य घेऊन पूजा करीत असत. हीच प्रथा अहिल्यादेवींनंतर होळकर घराण्याकडून होत आहे.

दरवर्षी नवरात्र उत्सव काळात श्री रेणुका मातेची भव्य अशी यात्रा भरत असल्याने येथे हजारो भाविक भक्त गर्दी करीत असतात. या मंदिराच्या उजव्या बाजूला रासलिंग इंद्रायणी किल्ला तर डाव्या बाजूस भगवान शिवशंकराचे चंद्रेश्वर मंदिर आहे. दर पौर्णिमेस रेणुकादेवीची पालखी सकाळी अहिल्यादेवींच्या रंगमहालातून देवीच्या मंदिरात जाते व सायंकाळी मंदिरातून रंगमहालात जाते, या पालखी मिरवणुकीच्या वेळी सुहासीनी आपआपल्या घरापुढे मनोभावे पालखीची पूजा करतात. ही प्रथा अनेक वर्षापासून चालत आलेली आहे. चैत्र पौर्णिमेला एक दिवस व अश्विन शुद्ध प्रतीपदेपासून दशमीपर्यत दहा दिवस यात्रा उत्सव साजरा केला जातो. या उत्सव काळात लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. या उत्सव काळात भाविक आपले नवस नारळ, हळदी कुंकू वाहून व जावळ काढून फेडतात. यात्रेच्या काळात फ ुलांच्या माळा, हार, नारळ यांची मोठ्या प्रमाणात दुकाने लावून त्यांची विक्री केली जाते. या यात्रोत्सव काळात पहाटे चार वाजेपासून देवीचा महाभिषेक केला जातो. यावेळी नामवंत कीर्तन प्रवचन करांचा लाभ भाविकांना होत असतो. सध्या मंदिराचा कारभार ट्रस्टकडे आहे

भाविकांसाठी अनेक प्रकारच्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.भाविकांच्या सहकार्याने मोठ्या प्रमाणात मंदिर परिसरात सुधारणा करण्यात आल्या आहेत. पिण्याचे पाणी, दिवे, भाविकांना घटी बसण्यासाठी निवासगृह, जनरेटर, लग्न समारंभ व धार्मिक कार्यक्रमासाठी जागा, स्वयंपाकांसाठी भांडी, विद्युत घंटा, सीसीटीव्ही कॅमेरे आदी सुविधा करण्यात आल्या आहेत.

नाशिक पासून चांदवड साधारण ६० किलोमीटर अंतरावर आहे नाशिक येथून बसेस उपलब्ध असतात तसेच खाजगी वाहने भरपूर आहेत तसेच उत्सव काळात जास्तीची वाहने उपलब्ध असतात. मालेगाव नाशिक महामार्गाला लागूनच हे मंदिर आहे.

## आजची माळ



**ज्योतिर्मय साहित्य**

अश्विन शुद्ध नवमी

नमस्कार

आज आपण देवीला नववी माळ वहाणार आहोत. सत्यवान सात्विक सत्त्य सत्यधर्म परायण

सत्ययुग, पुराण, वेदकाळ रामायण, महाभारत त्या नंतरचा लोटलेला हजारो वर्षांचा काळ या सर्वांची बेरीज करणे पण अवघड होते तेव्हा आपल्या हिंदूधर्म

किंवा त्याला आपण भारतीय संस्कृती असे देखील म्हणून शकतो. यामध्ये जे जे हिंदू धर्माचे सण साजरे

होतात. तेव्हा धर्माची पाळेमुळे आपल्या संस्कृतीचा वारसा सांगणारी प्रभावी कुळे व त्यांच्या आचारविचार शुध्द कर्माची फळे आज आपण चाखत असताना आपल्या महान संस्कृतीचा आदरभाव अजून उंचावतो.

देवी महात्म्यात याविषयी सखोल माहिती मिळाली आहे ते ते तुमच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला.

सौ.ऊज्वला धर्माधिकारी
पुणे

अजून समजून घ्यायला हवे.

कारण देवीचे महात्म्य हे थोडक्यात सांगण्याची गोष्ट नाही. त्यासाठी हवी श्रद्धा भक्ती

नवरात्री उत्सवाच्या निमित्ताने आपल्याला देवी मातेची सेवा करता आली यापुढेही आमच्या कडून अशीच सेवा करून घेत रहा अशी प्रार्थना करून आजच्या पुरती विश्रांती घेते.

# श्रीतुळजाभवानीमाता नवरात्र महोत्सव व तुळजाभवानीमाता माहात्म्य !

**ज्योतिर्मय साहित्य**

ही गोष्ट सन १९६२ ते १९६६ या कालावधीतील आहे. सन १९६२ साली माझ्या वडिलांची बदली पूर्वीचे उस्मानाबाद व आताचे धाराशिव जिल्ह्याचे ठिकाण येथे मुख्याध्यापक पदावर झाली होती. उस्मानाबादपासून तुळजापूर हे २२ ते २५ की.मी. अंतरावर आहे.त्याकाळी उस्मानाबादहून तुळजापूरला बसने जाण्यासाठी वीस पैसे तिकीट होते. लहान मुलांना अर्धे तिकीट दहा पैसे लागत होते. तुळजापूर येथे श्री तुळजाभवानीदेवीचे मुख्य मंदिर म्हणजेच मुख्य तिर्थक्षेत्र आहे. त्यामुळे, आईवडीलांसोबत आम्ही भावंडे नेहमी तुळजापूरला श्रीतुळजाभवानी मातेच्या दर्शनाला जात होतो. त्याकाळात मंदिर व मंदिराचा परिसर खूप रम्य आणि आल्हाददायक व मनाला खूप आनंद देणारा असा होता.मंदिराच्या शिखरावर दोन मनमोहक मोर उभे राहिलेले असत. ते पहाटे आपला मनमोहक पिसारा फुलवून मधुर आवाज करीत छान नृत्य करीत असत. त्याकाळात मंदिरातील फरशी ही फार पुरातन काळातील काळ्या, राखाडी रंगाच्या जाड व मोठ्या दगडांनी बनविलेली होती. त्यात १९५०-६० सालातील मोठ्या आकाराच्या ढब्बू रुपयासारखे दगडात अस्सल चांदीची मोठी नाणी खिळ्याने ठोकून पुर्ण मंदिरभर सहा सहा इंचाच्या अंतराने बसविण्यात आली होती. तसेच, श्रीजगदंबा देवीची प्राण्यांची वाहने वाघ, सिंह, हंस, गरुड, हत्ती इत्यादी प्राण्यांची वाहने ठेवण्यासाठी विशेष व्यवस्था प्रत्येक खोलीमध्ये केलेली होती. त्याच मंदिरात एका ठिकाणी एक चिंतामणीदेव नावाचा एक गोलाकार,वाटोळा दगड आहे. त्या दगडाच्या खाली खोलगट असा दूस-या दगडाचा भाग आहे. त्यावर हा चिंतामणीदेव ठेवला जातो. त्या दगडाच्या वरच्या बाजूला थोडीशी खोलगट जागा आहे. तिथे दहा पैशांचे नाणे ठेवून दोन्ही हात जोडून श्री जगदंबामातेचे श्रध्देने नामस्मरण करुन मनातली ईच्छा बोलून दोन्ही हात दगडाभोवती डोळे मिटून हलके हात ठेवायचे. तेव्हा तो चिंतामणीदेवाचा दगड ज्या त्या भक्ताच्या काम होण्याच्या कालावधीप्रमाणे उजव्या बाजूला फिरत राहतो. काम लगेच होणार असेल तर जोरात उजव्या बाजूला फिरतो. सावकाश थोड्या कालावधीनंतर काम होणार असेल तर हळूहळू फिरत राहतो. कामाला बराच कालावधी लागणार असेल तर तो चिंतामणी नावाचा दगड एकाच जागी स्थिर राहतो. याशिवाय, ज्या भक्ताने नमस्कार करुन इच्छा बोलून दोन्ही हात ठेवले आणि त्याचे काम जर ब-याच कालावधीपर्यंत होणार नसेल तर तो चिंतामणी दगड डाव्या बाजूला फिरतो. असा हा चिंतामणीदेव नावाचा दगड आहे. सर्व देवी भक्तांची त्यांच्यावर खूप श्रध्दा आहे. त्या चिंतामणीदेव नावाच्या दगडाचाही दरवर्षी

बोलीद्वारे लिलाव केला जातो. बरेचजण रक्कमेची बोली लावतात. ज्याची बोली जास्त रक्कमेची असेल त्याला त्या चिंतामणीदेव दगडाचा ठेका दिला जातो. नंतर हळूहळू महागाई वाढली की, त्या ठेक्याची किंमतही वाढत जाते. १९८०-८५ साली त्या दगडावर ५०पैसे ठेवावे लागत होते. नंतर २००० साली त्यावर एक रुपया ठेवावा लागला. २००५साली त्यावर पाच रुपये ठेवावे लागले. सन २०१० नंतर त्यावर दहा रुपये ठेवावे लागले. असे त्या चिंतामणीदेव दगडाचे महत्व आहे. तुळजापूर येथे श्रीतुळजाभवानीदेवी नवरात्राच्या महोत्सवाच्या काळात नऊ दिवस श्रीजगदंबामातेचे नवरात्र मोठ्या थाटामाटात पारंपारिक पद्धतीने साजरे केले जाते. तसेच, दहाव्या दिवशी विजयादशमी म्हणजे दसराही मोठ्या प्रमाणात थाटामाटाने साजरा केला जातो. नऊ दिवस रोज विविध अलंकाराने श्रीजगदंबामातेची महापूजा यथासांग साग्रसंगीत पध्दतीने केली जाते. त्यापूजेआधी मात्र श्रीजगदंबामातेच्या माहेरी देवीची पूजा चालू करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दोन तीन वेळा मोठ्याने आवाज दिला जातो. त्यानंतर, श्रीदूर्गादेवीमाता मंदिरातील श्रीतुळजाभवानी मातेच्या पूजेला सुरुवात होते. श्रीतुळजाभवानी मातेचे माहेर मंदिराच्या पाठीमागे साधारणपणे दोन कि.मी.अंतरावर डोंगर उतारावर आहे. आता सध्या खूप छान दगडाच्या पाय-या मंदिर समितीने केलेल्या आहेत. पूढे पायवाटेच्या दगड मातीचा व खडकाळ रस्ता आहे. बहुदा आता तो रस्ता डांबरीकरणकरुन नीट केलेला असावा. विजयादशमी म्हणजेंच दस-याच्या दिवशी श्रीजगदंबादेवी शिलांगणाला म्हणजेंच सीमोल्लंघनाला सोंगट्या खेळत खेळत माहेरीच्या मंदिरात जाते. तिथे त्या मंदिरात देवीला सोंगट्या खेळण्यासाठी सोंगट्यांचा पट मांडलेला असतो. श्रीतुळजाभवानी देवी त्या रात्री सोंगट्या खेळते. अशी दंतकथा आहे की, पुजारी रात्री सोंगट्यांचा पट मांडून संपुर्ण पटावर काळ्या व पांढ-या सोंगट्या मांडतात. श्रीजगदंबादेवी रात्री सोंगट्यांचा डाव खेळते असे म्हणतात.पुजारी नंतर सोंगट्यांच्या मंदिराचा दरवाजा बंद करुन घरी जातात. मुख्य आश्चर्याची गोष्ट अशी की, दूस-या दिवशी जेव्हा पुजारी सोंगट्यांच्या मंदिराचा दरवाजा उघडतो तेव्हा पटावरच्या सोंगट्या बाजूला पडलेल्या आढळून येतात. याचा अर्थ असा आहे की, श्रीतुळजाभवानी मातेने रात्री सोंगट्यांचा डाव खेळला असल्याचे स्पष्ट दिसून येते.नवरात्रात




श्रीतुळजाभवानी मातेला रोज विविध अलंकाराने, दागिन्यांनी तसेच, विविध सुगंधी फुलांनी सजविले जाते. सुगंधी चंदनाचे धूप देवीला ओवाळले जाते. पहाटे देवीची दही, केळी मिसळून भोगीपूजा, अभिषेकपूजा केली जाते. या पूजेला भोगीपूजा असे म्हणतात. काही महिला भक्त कुंकवाच्या संख्यांचा नवस बोललेल्या असतात. ते त्यांचा बोललेला नवस पुर्ण झाल्यानंतर नवस फेडण्यासाठी तुळजापूरला देवीच्या मंदिरात येतात. नवरात्रात देवीची पूजा पहाटे पाच पासून सकाळी नऊ वाजेपर्यंत केली जाते. काही भक्त लोकांनी नवस बोललेले असतात. दह्याच्या सिंहासनाचे किंवा श्रीखंडाच्या सिंहासनाचे ते त्यांचे नवस पुर्ण झाल्यानंतर मग, ते देवीचे भक्त नवस फेडण्यासाठी तुळजापूरला दूर्गादेवीमातेच्या मंदिरात येतात. अशा भक्तगणांच्या नवसाची पूजा त्यानंतर देवी मंदिरात होते. त्यानंतर, श्रीतुळजाभवानी मातेच्या मुख्य पूजेला सुरुवात होते. ही महापूजा साधारणपणे दोन ते तीन तास चालते. देवीच्या कपाळावर कुंकवाचा मळवट भरतात. हळद कुंकू लावतात. ही पूजा झाल्यानंतर श्रीजगदंबामातेला महावस्त्र म्हणजे खूप मौल्यवान अशी पैठणी पुजारी नेसवितात किंवा खूप मौल्यवान किंमतीची साडी नेसवितात. निरनिराळ्या सुगंधी फ ुलांचे हार देवीच्या गळ्यात घालून देवीला सजवितात. नंतर, श्रीजगदंबामातेच्या अंगावर सोन्याचे विविध प्रकारचे दागिने व अलंकार पन्नास ते साठ तोळ्यांचे दागिने, हिऱ्यांचे दागिनेही घालून पूजारी देवीला सजवितात .काही काही भक्तही खूप मौल्यवान किंमतीची पैठणी किंवा साडी देवीच्या चरणी अर्पण करीत असतात. नवरात्रात श्रीतुळजाभवानी मातेची रोज एक वेगवेगळ्या अवतारातील पूजा केली जाते. कधी महिषासुरमर्दिनी अवतारातील पूजा असते. कधी देवी व्याघ्रावर,कधी सिंहावर आरुढ झालेली पूजा असते. कधी शेष अवताराची पूजा असते. तर कधी मुरली अवतार पूजा असते. कधी भवानी तलवार हातात घेतलेली पूजा असते. ललिता पंचमी निमित्त श्री तुळजाभवानी देवीची रथ अलंकार महापूजा मांडली जाते. ही रथपूजा श्री तुळजाभवानी संस्थानतर्फे मांडली जाते. भगवान श्री सुर्यनारायण यांनी पाच अश्व असलेला हा रथ श्री तुळजाभवानी मातेला त्रिभुवन भ्रमणासाठी दिलेला आहे.नवरात्रात त्यानिमित्ताने या रथावर श्री जगदंबामाता आरुढ झालेल्या रुपात तसेच,अशा विविध अवताररुपात जगदंबादेवीची रोज नवरात्रात पूजा होत असते. श्रीतुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी आलेले स्त्रीपुरुष भक्तगण श्रीतुळजाभवानी मातेच्या नावाचा मंदिरात मोठमोठ्याने जयघोष करीत असतात. ते म्हणत असतात. आई राधा उदोउदो!बोल भवानीमाता की जय! अंबाबाईचा उदयोस्त! उदयोस्त! श्रीतुळजाभवानी माता की जय! भक्तगणांचा असा गजर सारखा चालू असतो. सर्व वातावरण अगदी प्रसन्न व भक्तीमय होवून गेलेले असते. इथे माणसांना सांसारिक गोष्टींचा

विसर पडलेला असतो. जगदंबा मातेच्या नामस्मरणात भक्तगण तल्लीन झालेले असतात. त्याकाळात आजच्यासारखी अमर्याद, बेसुमार गर्दी नव्हती. सर्वसामान्य लोकांनाही अगदी जवळून देवीमातेच्या चरणी माथा टेकवून शांततेने मनप्रसन्न दर्शन घेता येत असे. श्रीतुळजाभवानी मंदिरात प्रवेश केल्यावर दोन मोठे महाद्वार आहेत. मंदिरात प्रवेश करण्यासाठी आणि मंदिरातून बाहेर पडण्यासाठी! मंदिरात प्रवेश केल्यावर पन्नास साठ पाय-या उतरल्यावर गोमुख तीर्थ आहे. त्या गोमुखातून चौवीस तास जलतीर्थ पडत असते. स्त्री पुरुष भक्तगण त्याच्याखालीच स्नान करतात. नंतरंच,मग प्रथम श्रीगणेश देवाचे दर्शन घेवून मग श्रीतुळजाभवानी मातेच्या दर्शनाला जातात. रात्री दहा साडेदहा वाजेपर्यंत भक्तांच्या देवीच्या दर्शनासाठीच्या रांगा चालूंच असतात. रात्री साडेनऊ वाजता श्री जगदंबा मातेच्या पालखीची छबीना मिरवणूक निघते. त्या दिवशीच्या देवीच्या वाहन अवताराची प्रतिकृती पालखीत असते. त्या अवतारात

श्री भवानीमाता आरुढ झालेली असते. त्या छबीना पालखीच्या मंदिराभोवती तीन प्रदक्षिणा होतात. त्या प्रदक्षिणा होत असताना श्रीतुळजाभवानी देवीच्या नामाचा जयघोष चालू असतो. जोगवा,भजनं म्हणले जातात. नंतर देवीची मुर्ती मंदिरात स्थापित करतात. नं छानतर रात्री शेजारती होऊन जवळून असलेले मुख्यदर्शन बंद होते. फक्त दुरुन मुखदर्शन मात्र चालू असते. "सर्व मंगल मांगल्ये।शिवे सर्वार्थ साधिके! शरण्ये त्र्यंबके गौरी। नारायणी नमोस्तुते। सर्व भक्तांचं मंगल करणारी, सर्वांच्या मनातील इच्छा पुर्ण करणारी, अशा श्रीजगदंबामाते तुला मी शरण आलो आहे. जगाच्या नारायणाची, भगवंताची हे नारायणी देवी तुला माझा साष्टांग नमस्कार असो. साष्टांग दंडवत असो। असा श्रीतुळजाभवानी मातेचा अगाध महिमा आहे. जी भवानीमाता सदैव आपल्या भक्तांचा सांभाळ करीत असते. आई राधा। उदोउदो। बोल भवानीमाता की जय।

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559